


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : ८०६ वा मंगळवार दि. १८ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अवैध सावकार कृपलानीवर इतके वर्ष कुणाची कृपा होती?

## त्या अकोला जिल्हा उपनिबंधकांना कारवाईसाठी उशीर लागल्याबद्दल व्यक्त होतेय आश्चर्य

## उपनिबंधक अकोला श्रीमती ज्योती मलीये व त्यांच्या पथकाने अवैध सावकार यांच्यावर केलेल्या कारवाईचे सर्वत्र कौतुक

**जनसंचलन/बुलढाणा**

अकोला येथील अवैध सावकारी करणारा आणि कर्जदारांना प्रचंड मानसिक त्रास देत पठाणी वसुली करणाऱ्या मनोहर अडीतमल कृपलानी व दिनेश मनोहर कृपलानी याच्यावर झालेल्या कारवाईत प्रचंड कागदपत्रे सापडली आहेत.याचा अर्थ कृपलानी हा अनेक वर्षांपासून अवैध सावकारी करीत होता. परंतु महत्वाचा प्रश्न हा आहे की, इतके वर्ष कृपलानी याच्यावर अकोल्यातील व बुलडाणा येथील कोणते अधिकारी कृपा ठेवून होते? जी कारवाई आता झाली, ती कारवाई यापूर्वीच झाली असती, तर अनेकांना झालेला त्रासही वाचला असता. त्यामुळे जेंव्हा कृपलानीवर यासंदर्भात कारवाई होईल, तेंव्हा त्याच्या अवैध सावकारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही ठपका ठेवला जाणे आवश्यक आहे. सर्वसामान्य नागरिकांना कोणत्याही अत्यावश्यक कामासाठी, व्यवसायासाठी, शेतीसाठी कर्ज पाहिजे असल्यास आज आपल्याकडे बँका, पतसंस्थांचे एक मजबूत जाळे आहे. परंतु तरीही चटकन कर्ज प्राप्त व्हावे, यासाठी काही लोक हे अवैध सावकारांकडे जात असतात.अवैध सावकार मग त्यांच्या गरजेचा, त्यांच्या निकडीचा गैरफायदा घेण्याचे काम करतात. त्यापैकीच एक म्हणजे अकोला येथील अवैध सावकार मनोहर अडीतमल कृपलानी.व दिनेश मनोहर कृपलानी हा वरतून दाखवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय करायचा. परंतु त्याचा खरा धंदा हा अवैध सावकारीचा. या अवैध सावकारीच्या धंद्यातून कृपलानी याने प्रचंड माया जमवलेली आहे. ज्या लोकांना कर्ज देण्याचे काम केले, त्यांच्याकडून कोरे चेक, कोरे बाँड पेपर किंवा संपत्तीची कागदपत्रे तो ठेवून घ्यायचा. कर्जदारांनी कर्ज वेळेत जरी भरले, तरी त्यांना वेगवेगळ्या प्रकारे अवैधरित्या व्याज लावून तो कर्जदारांकडून प्रचंड प्रमाणात कर्ज वसूल करायचा.जे कर्जदार कर्ज परतफेड करू शकत नसायचे, त्यांना कोरे चेक, कोरे बाँड्स कोर्टात दाखवून त्यांच्यावर कारवाईची धमकी द्यायचा. बऱ्यचादा तर कृपलानी आणि त्याचे वसुली करणारे लोक हे कर्जदारांकडून पठाणी पद्धतीने, बळजबरीने पैशांची वसुली करायचे. पैसे वसूल करण्यासाठी कृपलानी सर्व प्रकारचे हथकंडे वापरायचा. हे सगळे प्रकार गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहेत. कृपलानी हा अवैध सावकरीचा धंदा करतो, हे अकोला येथील पोलिसांपासून ते जिल्हा उपनिबंधक कार्यालयापर्यंत सर्वांनाच माहिती होते. परंतु त्याच्यावर कोणीही कारवाई करण्याचे धारिष्ट्य व प्रामाणिकपणा दाखवला नाही. अकोला जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे मनोहर अडीतमल कृपलानी याच्या अवैध सावकारीच्या धंद्याकडे अक्षम्य असे दुर्लक्ष झालेले आहे. या दुर्लक्षामुळेच मग कृपलानी हा मस्तवाल झाला आणि जोरदार पद्धतीने अवैध सावकारी करू लागला. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने सातत्याने कृपलानी याच्या अवैध सावकारीच्या धंद्याविरोधात आवाज उठवण्याचे काम केलेले आहे. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचा ढिसाळ कारभार या माध्यमातून उघडा पडला आहे. अवैध सावकारी असो की, वेगवेगळ्या बँका-पतसंस्थांमध्ये

**मनोहर अडीतमल कृपलानी व दिनेश मनोहर कृपलानी अवैध सावकारी प्रकरणाचा भंडाफोड पुढील पाठपुरावा सत्रात**

होणारे घोटाळे असोत, राज्याचे सहकार आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालय या सर्वांचेच याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या या मेहेरबानीमुळेच मग कृपलानी याचा अवैध सावकारीचा धंदा चांगलाच फोफावला. त्याचा व्यवसाय किती प्रचंड प्रमाणात आहे हे, अकोला येथील उप निबंधक श्रीमती त्याच्याकडे छापा पडल्यानंतरच लक्षात आहे. उशिरा का होईना परंतु जनरेटा वाढल्यामुळे अखेर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने त्याच्याकडे छापा टाकला. त्या छाप्यात ६५ कर्जदारांचे मोठ्या प्रमाणात कागदपत्र सापडले. खरेतर ही कारवाई आधीच होणे अपेक्षित होते. कारण कृपलानी हा अनेक वर्षांपासून अवैध सावकारीचा धंदा करतो. परंतु त्याच्या या धंद्यावर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने मोठी मेहेरनजर केल्याचे दिसून येत आहे. कृपलानी याच्या अवैध सावकारीच्या धंद्याकडे दुर्लक्ष करून त्याच्यावर कृपा बरसवणाऱ्या अधिकाऱ्यावरही कारवाईची अपेक्षा आहे. कृपलानी याच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने पाठपुरावा करीत राहणार आहे. कृपलानी याच्यासारखे अकोला व बुलडाणा जिल्हा




व राज्यभरात जेव्हढे अवैध) सावकार आहेत, त्या सर्वांवरच कारवाई होणे गरजेचे आहे. सर्वसामान्य नागरिकांची अड़वणूक व लुबाडणूक अवैध सावकार करीत आहेत. त्यांच्याकडून अव्वाच्या सव्वा व्याज वसुली करीत आहेत, सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास देत आहेत. या स्थितीत इतर सावकारांवर ही कारवाई करावी. जोपर्यंत अशा प्रकारची कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या विरोधात आवाज उठवतच राहणार आहे.

**अजून बरेच काही पुढील भागात**

# अज्ञात चोरट्यांनी वाइन बार फोडले !

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

देऊळगावराजा असोला जहांगीर शिवरातील बारचे अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना १६ जून रोजी मध्यरात्री घडली. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला - आहे. रवींद्र नारायण बुरुकुल यांचे असोला जहांगीर शिवारात वाईन बार आहे. या बारमध्ये अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून महागडे विदेशी मद्य आणि रोख ३ हजार ५०० रुपये, असा १ लाख १९ हजार ७६ रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी देऊळगावराजा पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संतोष महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ विश्वनाथ काकड करीत आहेत.गत काही दिवसांपासून देऊळगावराजा शहरासह परिसरात चोरीच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे, व्यवसायिकांमध्ये भितीचे वातावरण आहे. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.



# घरासमोर उभी असलेली चारचाकी कार चोरट्याने केली लंपास

**जनसंचलन/मलकापूर**

येथील रामवाडी परिसरात घरासमोर उभी असलेली चारचाकी चोरीला गेल्याची घटना रविवारी रात्री घडली. शहर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात आरोपींविरुद्ध सोमवारी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. रामवाडी परिसरातील रहिवासी राजकुमार नारायण पाटील यांनी नेहमीप्रमाणे घराच्या अंगणात एम.एच.१२/एच.एन.



६५२७ क्रमांकाची चारचाकी उभी केली होती. रविवारी सकाळी त्यांच्या अंगणातील चारचाकी गायब असल्याचे निदर्शनास आले. राजकुमार पाटील यांनी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली

# मातृतीर्थ जिल्ह्याच्या भरीव विकासासाठी केंद्रीयमंत्र्यांची एकदिलाची हाक...

## हेवेदावे विसरून काम करण्याचे आवाहन : ना. प्रतापराव जाधव यांच्या भूमिकेचे जिल्हाभरातून समर्थन सोशल मीडियावर होतेय निर्णयाचे स्वागत

जनसंचलन/बुलढाणा

निवडणूक ही तात्पुरती आरोप-प्रत्यारोपाची असते. जय-पराजय हा जिव्हारी लावायचा नसतो. विकासाचे राजकारण करण्याची मिळणारी संधी म्हणजे राजकारण होय. हेच राजकारण प्रतापराव जाधव आपल्या अख्ख्या राजकीय कारकीर्दीत करत आले आहेत. खासदार म्हणून जिल्ह्यासाठी त्यांनी भरीव विकास निधी खेचून आणत कामेही पूर्णत्वास नेली. आता तर केंद्रीय मंत्रिपद मिळाल्यामुळे मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली असून याच संधीचे सोने करत जिल्ह्यामध्ये विकासाची गंगा नियमित वाहती ठेवता येईल, यासाठी झटत राहील, अशी ग्वाही नामदार प्रतापराव जाधव यांनी तमाम जनतेला दिली आहे. फक्त आणि फक्त विकास हेच ध्येय समोर ठेवून कार्य करायचे आहे, त्यासाठी सर्वांनी हेवे दावे विसरून एकदिलाने काम करावे, मला सहकार्य करावे, असे भावनिक आवाहन ना. जाधव यांनी समाजमाध्यमांवरही केले आहे. त्यांच्या या भूमिकेला जिल्हाभरातून सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसत आहे. विकासाचे राजकारण हे जनतेच्या हिताचे असल्याने ठिकठिकाणी प्रतापराव जाधव यांच्या एकदिलाने काम करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. चिखली तालुक्यातील देऊळगाव घुबे येथील ज्येष्ठ नागरिक तथा जानकीदेवी विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष, शेणफडराव घुबे यांनी केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री नामदार प्रतापराव जाधव यांच्या आवाहनाचे स्वागत करत सोशल मीडियावर एक पोस्ट टाकून सर्वांनी जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने नामदार जाधव यांचे हात बळकट करण्यासाठी पुढे येऊन हेवेदावे विसरण्याचा लाख मोलाचा सल्ला दिला आहे. शांत, संयमी नेते असलेले प्रतापराव जाधव यांनी कधीच कपटी राजकारण केले नाही. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण या धोरणानुसार त्यांची वाटचाल सुरू आहे. त्यातच विकास एके विकास याचाच पाढा वाचणारे प्रतापराव जाधव जिल्हावासियांनी जवळून अनुभवले आहेत. त्यामुळेच नागरिकांनी चौथ्यांदा विश्वास टाकत त्यांना संसदेत पुन्हा नेतृत्व करण्याची संधी दिली आहे. संसदेत जिल्ह्याचे नेतृत्व करत विकासासाठी हजारो कोटी रुपयांचा निधी खेचून आणला. विकास कामे ही पूर्ण केली. खासदारकीच्या काळातील प्रस्तावित कामेही करणे बाकी आहेत. ती कामे पूर्णत्वास नेण्यासह नव्याने जिल्ह्यात मोठ मोठे प्रकल्प आणून जिल्ह्याचा कायापालट करण्याचा निर्धार



त्यांनी केला आहे. सुशिक्षित बेरोजगार व अन्य घटकातील लोकांना रोजगार देण्यासाठी औद्योगिक प्रकल्पदेखील आणण्याचा मनोदय प्रतापराव जाधव यांनी केला आहे. हा मानस पूर्ण करण्यासाठी जिल्हावासियांकडूनही त्यांना सहकार्याच्या अपेक्षा आहेत. राजकारण बाजूला ठेवून विकासाच्या नजरेतून पाहणारा चष्मा सर्वांनी चढविणे गरजेचे असल्याचा उल्लेख करणाऱ्या पोस्ट सध्या समाजमाध्यमांवर फिरत आहेत. नामदार प्रतापराव जाधव यांनी निवडणूक संपली, आता एकत्र येत विकास करूया... असे केलेले आवाहन राजकीय नेत्यांसह सर्वांनीच मनावर घेतल्यास नक्कीच जिल्ह्याचा कायापालट होईल, अशा प्रतिक्रियादेखील जिल्हाभरातून उमटू लागल्या आहेत.

# बुलढाण्यात होणाऱ्या पोलीस भरतीसाठी पोलीस प्रशासन सज्ज...

## भरती दरम्यान काही गैरप्रकार आढळून आल्यास पोलीस प्रशासनाला कळवावे जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे आव्हान

जनसंचलन/बुलढाणा

खाकी वर्दी अंगावर असावी,असे अनेकांचे स्वप्न असते. आणि या स्वप्नपूर्तीसाठी आजचा तरुण वाटेल ते कष्ट उपसत असतो. राज्यात निवडणुकीच्या आचारसंहिता सुरू असल्यामुळे ही भरती उशिरा घेण्यात येत आहे. बुलढाण्यात तब्बल १३३ जागांसाठी १०,२३६ अर्ज प्राप्त झाले आहे. मैदानी चाचणी करिता सुरुवातीच्या दोन दिवस प्रतिदिन ५०० याप्रमाणे उमेदवार बोलविण्यात आले असून उर्वरित दिवशी बोलाविण्यात आलेले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की,बुलढाणा जिल्हा पोलीस दलातील रिक्त असलेल्या पदनिहाय प्रमाणे पोलीस शिपाई- १२५ पदे ( ३८ पदे महिलाकरीता व उर्वरित ८७ पदे पुरुष सर्वसाधारण) उमेदवारांकरीता आहे व पोलीस शिपाई (बॅण्डस्मन ) - ०८ (०२ महिला व ०६ पुरुष सर्वसाधारण) पदे अशी एकुण १३३ रिक्त पदांची पदभरती दिनांक १९/०६/२०२४ते दि. ०३/०७/२०२४पर्यंत एकुण १३ दिवसाच्या कालावधीमध्ये शारिरीक मोजमाप चाचणी/मैदानी चाचणी / कागदपत्र पडताळणीबाबतची प्रक्रियेची कार्यवाही पोलीस कवायत मैदान, पोलीसमुख्यालय बुलढाणा येथे आयोजित करण्यात आलेली आहे.सदर पोलीस भरती मध्ये पोलीस शिपाई पदाकरीता ८५३१ व पोलीस शिपाई (बॅण्डस्मन) पदाकरीता १७०५ असे एकुण १०२३६ आवेदन अर्ज प्राप्त झालेले आहेत. उमेदवारांची शारीरिक मोजमाप चाचणी (छाती /उंची) व मैदानी चाचणी १०० मीटर धावणे व गोळा फेक या मैदानी चाचण्या हया पोलीस मुख्यालय बुलढाणा येथील पोलीस कवायत मैदानावर घेण्यात येणार असुन १६०० मीटर धावणे व ८०० धावण्याची चाचणी बुलडाणा ते धाड रोडवरील निश्चीती केलेल्या ठिकाणी घेण्यात येत आहे. सदर रस्तावरील मैदानी चाचणी दरम्यानची




पर्यायी वाहतुक व्यवस्था जिल्हा पोलीस दलाचे वतीने करण्यात आली भरतीच्या दरम्यान काही गैरप्रकार आढळून आल्यास जसे की पैशाची मागणी करून नोकरीला लावून देतो असे कुठल्याही गोष्टीला बळी पडू नका आढळून आल्यास त्वरित पोलीस प्रशासनाला कळवावे तसेच तसेच उमेदवारांनी भरती दरम्यान मादक किंवा स्टेनोज किंवा शक्ती वर्धन औषध घेऊन ज्यामुळे आपण भरती दरम्यान फिजिकल परफॉर्मन्स चांगला होईल या उद्देशाने आल्यास त्यांची मेडिकल तपासणी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल असे आव्हान जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी केले आहे

# संगणक टंकलेखन परीक्षेत बोगसबाजी करणाऱ्यांवर कडक कारवाई व्हावी -अरूण चांडक

जनसंचलन/ शेगाव

जिल्ह्यात संगणक टंकलेखन परीक्षेत चिखली येथील परीक्षा केंद्रावर झालेल्या प्रकरणासंदर्भात शासनाने कडक कारवाई करावी, अशी मागणी राज्य संघटनेचे सहसचिव तथा जिल्हा प्रतिनिधी अरूण चांडक यांनी केली आहे. १३ जून रोजी चिखली येथील अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणेतर्फे घेतल्या गेलेल्या संगणक टंकलेखनाचे परीक्षा केंद्र होते. प. प. चे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी वरील केंद्रावर व्हीटीओ कॉल करून परीक्षेला किती विद्यार्थी आहेत. याची विचारणा केली असता आयटी टिचर यांनी १४ विद्यार्थी असल्याचे सांगितले. परंतु प. प. च्या ऑनलाईन ॲक्सेसमध्ये २२ विद्यार्थी हजर दिसत होते. त्यामुळे वरील केंद्रावर ८ विद्यार्थी बाहेरून परीक्षा देत असल्याची शंका आली. त्यावरून बुलडाणा शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना आदेश देऊन पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यास सांगितले. अरूण चांडक यांनी प्रकरणात दोषी असलेल्या सर्व संबंधीतावर कडक




कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. अनुराधा संस्थेचे राहुल बोंद्रे यांनी विद्यार्थ्यांना सोयीचे व्हावे, याकरिता महाविद्यालयात केंद्र उपलब्ध करून दिले, हे सत्य आहे. प्रतिक्रिया देतांना ते म्हणाले की, जिल्हात ७ केंद्रावर परीक्षा होत आहे. सर्वच केंद्रांवर अशा प्रकारची कामे होतात. यावर बोलतांना चांडक यांनी बाकी केंद्रांची सत्यता पळताळून प्रतिकींया दिल्यास अधिक योग्य झाले असते असे म्हटले. प.प. चे अध्यक्ष बेडसे प्रत्येक केंद्राची व्हीडीओ व्दारे तपासणी करतात. ज्या ठिकाणी काही अनियमियतता आढळल्यास तेथे कारवाईचे आदेश देतात. त्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.शिक्षणाधिकारी यांनी १८ जूनपासून सुरू होणाऱ्या मराठी टायपींगच्या परीक्षेच्यावेळी सर्वच केंद्राची तपासणी करावी, असे म्हटले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जिल्हाधिकाऱ्यांकडून सिंदखेडराजा येथील ऐतिहासिक वास्तू व ईश्वेद बायोटेकची पाहणी




**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी १६ जून रोजी सिंदखेड येथील विविध ऐतिहासिक वास्तूची केली. डॉ किरण पाटील सिंदखेड राजा येथे असता, त्यांनी राजे लखजीराव जाधव राजवाड्याची पाहणी करुन राजमाता जिजाऊ यांचे दर्शन घेतले. राजवाड्यात सुरू असलेल्या कामासंदर्भात विचारपूस करत सदर काम चांगल्या दर्जाचे करणे बाबत सूचना केल्या. त्यानंतर त्यांनी पुतळाबारव याची सुद्धा पाहणी केली.भुईकोट किल्ला, काळाकोट याचीसुद्धा केली. रंगमहाल, निळकंठेश्वर मंदिर, राजे लखुजीराव जाधव यांची समाधी, रामेश्वर मंदिर यासह अन्य ऐतिहासिक वास्तूंची पाहणी केली.यानंतर जागतीक ईश्वेद बायोटेक कंपनीची पाहणी केली याप्रसंगी त्यांच्यासोबत अधिकारी प्रा. संजय खडसे,ईश्वेद बायोटेकचे संजय वायाळ पाटील यांच्यासह मान्यव उपस्थित होते.

# बंद पडलेली भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना सुरु करण्याची मुख्यमंत्र्याकडे मांगणी - सदानंद वाघमारे

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

महाराष्ट्र शासनाने इयत्ता १० वी मध्ये ९०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेल्या अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी सदानंद अर्जुनराव वाघमारे यांनी १४ जुन रोजी जिल्हाधिकारी साहेबामार्फत मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या कडे केलीआहे

महाराष्ट्र शासनाने इयत्ता १० वी मध्ये ९०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेल्या अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांना व्यवसाई क शिक्षणासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना शैक्षणीक वर्ष २०२१ पासून लागू केली होती. सदर योजनेमध्ये पुरस्काराची रक्कम २०००००/- दोन लक्ष रुपये (पुढील दोन वर्षासाठी १ लक्ष प्रमाणे) सुरू होती. मात्र मागील काही दिवसांपासून सदर योजना बार्टीने बंद केली आहे. यासारख्या अनुसुचित जातीसाठीच्या इतर योजनासुध्दा बंद केलेल्या आहे. तरी मे. साहेबांना विनंती की, सदर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना पुन्हा सुरू करुन अनुसुचित जातींना सामाजीक न्याय द्यावा हि मागणी केली आहे सदर निवेदनाच्या प्रतिलीपी १) मा. डॉ. राजेंद्रजी शिंगणे साहेब, आमंदार, सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघ. २) मा.ना.प्रतापराव



जाधव साहेब, नवनिर्वाचीत खासदार बुलढाणा लोकसभा मतदारसंघ तथा केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री भारत सरकार नई दिल्ली. सचिव, सामाजिक न्या विभाग मंत्रालय, मुंबई . संचालक, बार्टी, पुणे. यांना देण्यात आल्या

# बिबट्याच्या हल्यात गाईचे वासरू ठार

**जनसंचलन/ धामणगाव बढे**

गुरांसोबत बांधून असलेल्या वासरावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना धामणगाव बढेनजीक पांगरखेड शिवारात १६ जूनच्या रात्री घडली. १७ जून रोजी सकाळी वासराचा मृतदेह आढळल्यानंतर ही घटना उघडकीस आली. माजी सरपंच दिनकर बढे यांच्या शेतात दोन बैल, गाय आणि एक वासरू बांधलेले होते. या वासरावर बिबट्याने हल्ला करून ठार केले. बढे यांनी वासराचा शोध घेतला असता, १६ जून रोजी वासरू मृतावस्थेत आढळून आले. वन विभागाने वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करून नुकसानभरपाई देण्याची मागणी दिनकर बढे यांनी



केली आहे. कापूसवाडी धरणापासून जवळच असून, या परिसराला लागून जंगल असल्यामुळे येथे वन्य प्राण्यांचा संचार आहे. मागील काही दिवसांपासून वाघाचा या भागात संचार असून, शेतातील कुत्रे सुद्धा वन्य प्राण्यांनी फस्त केले आहेत.

# वरिष्ठांची साथ आणि आशीर्वाद राहिले तर खडसे-महाजन सोबत दिसतील !

## केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांना विश्वास

**जनसंचलन/शेगाव**

ज्येष्ठ नेते एकनाथराव खडसे आणि गिरीश महाजन हे एकत्र यायला पाहिजे हे आधीपासूनच प्रयत्न राहिले आहेत. आता जर वरिष्ठांची साथ राहिली आशीर्वाद राहिले तर हे दोन्ही नेते लवकरच सोबत दिसतील,आणि पक्षासाठी चांगलं काम करतील. असा विश्वास देशाच्या केंद्रीय राज्यमंत्री ना. रक्षा खडसे यांनी व्यक्त केला आहे.

केंद्रीय मंत्री झाल्यानंतर शनिवारी रक्षा खडसे यांनी पहिल्यांदाच संत नगरी शेगावमध्ये पोहचून श्री संतत गजानन महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी विश्राम भावनाबाहेर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यादरम्यान, त्यांना दोन्ही नेत्यांमधील संघर्षाबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना दोन्ही नेत्यांनी आता आरोप-प्रत्यारोप थांबवून जळगावच्या विकासासाठी एकत्र यायला पाहिजे अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. ना. रक्षा खडसे पुढे म्हणाल्या कि, परिवारासह मतदार संघातील अनेक कार्यकर्त्यांनी संत गजानन महाराज



यांच्याकडे विंनती केली होती कि, निवडणुकीतील तिकीट मिळण्यापासून निवडून आल्या पाहिजे यासाठी इथे प्रार्थना केली होती. त्याच अनुषंगाने आज परिवार आणि कार्यकर्त्यांसह श्री चरणी आपण माथा टेकत देशाच्या उज्वल भविष्यासाठी अधिक काम करण्यासाठी बळ मिळो अशी मागणी यावेळी श्री चरणी केली.

# एकांबा शेतशिवारातील रस्त्याची झाली पहिल्याच पावसात दुरावस्था...

**जनसंचलन/ शेगाव**

मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी ते एकांबा शेतशिवारात जाणाऱ्या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था पहिल्याच पावसात झाली. जुना रस्ता होता तो नवीन डांबरीकरण करण्यासाठी प्रस्ताव मंजूर करण्यात आला. परंतु हा रस्ता अर्धवट झाल्यामुळे पहिल्या रस्त्यापेक्षा आता खूप मोठी दयनीय अवस्था रस्त्याची झाली आहे. पेरणीसाठी शेतात ट्रॅक्टर नेण्याचा प्रश्न शेतकऱ्यांवर उभा ठाकला आहे. दिनांक १७ जून रोजी या रस्त्यावरून ट्रॅक्टर घसरून थोडक्यात मोठी दुर्घटना टळली. निदान जेवढा रस्ता बनवायचा तेवढा संबंधित ठेकेदाराने पूर्ण बनवायला हवा होता अशा प्रकारच्या प्रतिक्रिया शेतकरी वर्गामधून उमटत आहे. शेतकरी आंदोलनाच्या तयारीत असल्याची माहिती संजय मगर, पांडुरंग मगर, राजेश मगर, सुशिलाबाई मगर, मंगला बाई मगर, शोभाबाई मगर, गणेश मगर, भानुदास मगर, योगेश्वर महाराज मगर, सचिन सुभाष मगर, बंडू बळी,यासह अनेक शेतकऱ्यांनी केली आहे. लवकरात लवकर संबंधित ठेकेदार यांनी रस्ता व्यवस्थित करावा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा १७ जून रोजी वरील शेतकऱ्यांसह परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.



लोकप्रतिनिधींनी सुद्धा या बाबीकडे लक्ष द्यावे व शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवावा अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# बुलढाणा शहरात चोरट्यानें घातला थैमान...

## चोरट्यांनी तर हद्दच केली जिल्हा सत्र न्यायाधीश यांच्या बंगल्यावर साधला निशाणा

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरात चोरट्यांनी चांगलाच थैमान घातलेला आहे. शहरात मागील काही काळापासून चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. चोर इतकी बेभान झालेले आहे की त्यांच्या मनात पोलिसांचा थोडाही धाक दिसून येत नाही. आता हा पोलीस प्रशासनावर प्रश्नचिन्ह ? उपस्थित झाला आहे. मागच्या महिन्यात ६ मे ला विष्णूवाडी येथील शासकीय बंगल्यात राहणारे मा. न्यायाधीश ए.एम.मगरे यांच्या बंगल्यातून तस्करांनी चंदनाचा झाडच कापून नेला होता. तर ३ दिवस आगोदर जिल्हा पोलीस मुख्यालयात बांधण्यात आलेल्या नवीन वसाहतीच्या इमारतीतून २ लाख ९१ हजार रुपयांचा साहित्य चोरण्यात आला. आता जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. खटटी यांच्या बंगल्यात चोरीचा प्रयत्न असफल झालेला आहे.

या बाबत हकिकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी पो-लीस हेडकॉन्स्टेबल पंकज रमेश गायकवाड यांनी १६ जूनला सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की,त्यांची दुपारी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.खटटी साहेब यांच्या निवासस्थानी ड्यूटी सुरु असतांना कोर्टाचे शिपाई शेळके यांनी आवाज दिला असता ते त्यांच्याकडे गेले तेव्हा शिपाई शेळके याने सांगीतले की २ महीला निवासस्थानाच्या भिंतीवरुन आतमध्ये आल्या आहे.तेथे गेलो व त्या महीलांना विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली.त्यांना निवासस्थान परीसरात येण्याचे कारण विचारले असता त्याबाबत सुध्दा समाधानकारक उत्तर दिले नाही.दोन्ही महिला स्टोअर रुम मध्ये काहीतरी चोरी करण्याच्या उद्देशाने




आल्या होत्या.अश्या तक्रारीवर आरोपी आशा दिलीप लावाडकर वय ४० वर्षे आणि अरुणा रमेश लावाडकर वय ४५ वर्षे दोन्ही रा.माहोरा ता. जाफ्राबाद,जि.जालना यांच्याविरुद्ध बुलडाणा शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पूजा शिक्षण प्रशिक्षण संस्था खामगाव बांधकाम पर्यवेक्षक व नर्सिंग अभ्यासक्रमासाठी प्रचंड प्रतिसाद...

**जनसंचलन/खामगाव**

महाराष्ट्र शासनाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण मंडळ ,मुंबई. यांना सलग्नित पूजा शिक्षण प्रशिक्षण संस्था ,खामगाव. या संस्थेमध्ये स्वयं अर्थ साह्य तत्त्वावर मान्यता असलेल्या ,सिविल गटातील बांधकाम पर्यवेक्षक प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा कोर्स यशस्वीरित्या सुरू असून शेकडो विद्यार्थी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग ,जिल्हा परिषद बांधकाम विभाग , पंतप्रधान ग्रामसडक योजना तसेच जलसंधारण विभाग इत्यादी ठिकाणी असिस्टंट इंजिनिअर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून रुजू झालेले आहेत. त्यापैकी बऱ्याच विद्यार्थ्यांचे इंजिनियर पदावर प्रमोशन झालेले आहेत. काही विद्यार्थी या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून गव्हर्मेंटची लायसन प्राप्त झाल्यामुळे यशस्वी गव्हर्मेंट ठेकेदारीचा व्यवसाय करत आहेत. काही विद्यार्थी नियमित उपस्थित राहून सिविल विभागाचे कौशल्य प्राप्त केल्यामुळे बांधकाम ठेकेदार म्हणून यशस्वीपणे कन्स्ट्रक्शन कामात ठसा उमटवित आहे. तर काही विद्यार्थी हाउस कन्स्ट्रक्शन फर्म ,रोड कन्स्ट्रक्शन कंपनीमध्ये ,कन्स्ट्रक्शन सुपरवायझर म्हणून नोकरी करत आहे. पूजा शिक्षण प्रशिक्षण संस्था खामगाव बांधकाम पर्यवेक्षक व नर्सिंग अभ्यासक्रमासाठी प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

तर २०२२ पासून इच्छुक मुली व अडचणीत असलेल्या महिलांना रोजगार प्राप्त करून देण्यासाठी पॅरामेडिकल गटातील नर्सिंग केअर हा एक वर्षीय अभ्यासक्रम संस्थेने सुरू केला आहे. सदर दोन्ही अभ्यासक्रमासाठी संस्थेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे .शासनाच्या कौशल्यावर आधारित सदर अभ्यासक्रमाला प्रवेशित विद्यार्थी नियमित क्लास करतात, संस्थेच्या वतीने उत्कृष्ट प्रशिक्षण राबविण्यात येत आहे . अभ्यासक्रमाशी निगडित असलेले संपूर्ण प्रॅक्टिकल, विविध प्रोजेक्ट ,शैक्षणिक सहली, शैक्षणिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वर्षभर कार्यरत ठेवल्या जाते. वर्ष कसे निघून जाते ,विद्यार्थ्यांना ठाम पत्ता लागत नाही .लोकसंख्या वाढत आहे. दरवर्षी हजारो नवीन घरे बनतात .त्यासाठी रोड बनतात . कन्स्ट्रक्शन व सुपर विजन करण्यासाठी या बांधकाम अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना इंजिनीयर म्हणून प्रचंड मागणी आहे. तर पॅरामेडिकल गटातील नर्सिंग या अभ्यासक्रमातील प्रशिक्षणार्थ्यांना वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवनवीन हॉस्पिटल उघडत असून त्यामध्ये नर्सिंग केअर या पदाला सुद्धा प्रचंड मागणी आहे.

मी विद्यार्थ्यांना आवाहन करतो की ज्यांना दहावी बारावीला आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार द्वितीय श्रेणीचे गुण मिळाले आहे किंवा जे विद्यार्थी बारावी परीक्षेत उत्तीर्ण झाले नाही जे विद्यार्थी पारंपारिक एज्युकेशन घेऊन नोकरी मिळत नाही म्हणून डिप्रेशन मध्ये जाण्याच्या स्थितीत असतील, अशा विद्यार्थ्यांनी व पालकांनी संस्थेला एकदा भेट द्यावी व आपल्या पाल्याचे भविष्य यशस्वीपणे घडविण्यासाठी संस्था किती प्रयत्न करू शकते हे बघून प्रवेश घेण्यास काही हरकत नाही.

# शिवसाई युनिव्हर्सल जुनियर कॉलेजच्या मानव जाधव यांनी मिळवले आंतरराष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत सिल्वर मेडल

**जनसंचलन/बुलढाणा**

शिवसाई युनिव्हर्सल जुनियर कॉलेजच्या मानव जाधव यांनी आंतरराष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत सिल्वर मेडल मिळवले आहे.नुकत्याच दि २ जुले ते ११ दरम्यान आयोजित आंतरराष्ट्रीय आर्चरी स्पर्धेचे आयोजन दक्षिण कोरिया या ठिकाणी करण्यात आले होते. या स्पर्धेत भारतीय संघ देखील दाखल झाला होता. या भारतीय संघात महाराष्ट्रातून मानव जाधव या खेळाडूची निवड झाली होती. या स्पर्धेत भारतीय संघाने उत्कृष्ट खेळी करून सिल्वर पदक प्राप्त केले आहे. मानव जाधव हा शिवसाई युनिव्हर्सल ज्युनिअर कॉलेजमध्ये कोलवड बुलढाणा या महाविद्यालयात वर्ग १२ मध्ये शिक्षण घेत आहे. मानवणे या अगोदर देखील आपल्या देशाला आंतरराष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त करून दिली आहे. मानव हा जिल्हा प्रशिक्षण केंद्रात रोज सराव करतो. यावर्षी मानवणे खेलो इंडिया युथ स्पर्धेत देखील आपल्या राज्याला पदक प्राप्त करून दिले आहे. मानवला महाराष्ट्र शासनातर्फे स्कॉलरशिप देखील दिली गेली आहे. मानवच्या या यशाबद्दल शिवसाई युनिव्हर्सल स्कूलचे संचालक डी एस लहाने सर , प्राचार्य दाभाडकर सर यांनी देखील मानवचे अभिनंदन केले आहे. मानवणे आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई वडील प्रशिक्षक चंद्रकांत इलग सर क्रीडा शिक्षक सागर उबाळे सर यांना दिले आहे. थोड्याशा गुणाने भारतीय संघ ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत क्वालिफाय होऊ शकला नाही. तरी यापुढे चांगली तयारी करून




भारतीय संघ ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत क्वालिफाय होईल अशी आशा बोलताना डी एस लहाने यांनी व्यक्त केली आहे. सर्व क्रीडा क्षेत्रात मानवचे अभिनंदन व स्वागत होत आहे.

